177

क्र : बीएमआरडीए/एमटीजी/२७.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

दिनांक : १७ फेब्रुवारी, १९८३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २८ जानेवारी, १९८३ रोजी झालेल्या सत्ताविसाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत कांही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

श्र. वि. आसगांवकर 17/2/83

( श्र. वि. आसगांवकर )
सचिव,
कार्यकारी समिती.

प्रति :

सर्व सदस्य व कायम निमंत्रित.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी.

No. BMRDA/MTG/27.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan, 5th Floor,
Bandra (East), Bombay-400 051.

17th February, 1983.

The minutes of the 27th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 28th January, 1983 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

SVAsgaonkar 17/2/83
(S. V. ASGAONKAR)
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To

All Members and Permanent Invitees.
The Officers of the B.M.R.D.A.

-.-.-.-.-.-.-.-.-

ukd:

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
सत्ताविसाव्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २८ जानेवारी, १९८३

वेळ : सकाळी १०.३० वाजता (शुक्रवार)

स्थळ : समिती कक्ष, सहावा मजला, मंत्रालय

या बैठकीस उपस्थित राहिलेल्या सदस्यांची यादी सोबत जोडली आहे. (कृपया जोडपत्र-'अ' पहावे.)

अध्यक्षांच्या अभिभाषणाने बैठकीचे कामकाज सुरु झाले. अभिभाषणाची प्रतिलिपी जोडपत्र 'ब' च्या स्वरुपात सोबत जोडली आहे.

त्यानंतर माजी महानगर आयुक्त श्री.भा.कृ.ढळवे यांच्या सेवेचा गौरव करणारा ठराव स्वीकृत करण्यात आला. (कृपया जोडपत्र 'क' पहावे).

बैठकीच्या कार्यसूचीवर विचारविमर्श करताना बाब क्र. १ ते ६, ८, ९, ११, व १४ तसेच पटल बाब प्रथम विचारांत घेण्यांत यावी आणि वेळ शिल्लक राहिल्यास इतर बाबींवर विचारविमर्श केला जावा असे मान्य करण्यांत आले.

बाब क्र.१ : मागील (२६व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

सदर कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र.२ : मागील (२६व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही.

प्रस्तुत बाबींवर झालेल्या चर्चेच्या ओघात पुढील प्रमाणे मत प्रदर्शन होऊन मुद्दे मांडण्यात आले :

(१) मुंबईच्या पाणी पुरवठयाच्या हिताच्या दृष्टीने मध्य वैतरणा प्रकल्पाची शीघ्रतेने कार्यवाही करण्यात यावी या सूचनेचा पुनरुच्चार करण्यात आला. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या अर्थबळ उभारणीच्या प्रश्नाची अग्रक्रमाने चिकित्सा करण्यात यावी असेही मत या संदर्भात व्यक्त करण्यात आले. प्रस्तुत प्रश्नावर महानगरपालिका आयुक्तांनी मुंबई महानगर पालिकेतील पक्ष नेत्यांच्या विचारविनिमयार्थ तयार केलेल्या टिप्पणीची प्रत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सदस्यांनाही उपलब्ध करुन दिली जावी असे यावेळी सुचविण्यात आले.

(२) बाब क्र.५ वरील म्हणजे 'कल्याण विकास केंद्रा'साठी भूमी संपादन करण्यासंबंधीच्या बाबीवरील अनुवर्ती कृतीच्या अनुलक्षाने, या विकास केंद्राच्या जमिनीवर उदाहरणार्थ, कोळसेवाडी आदी बऱ्याच ठिकाणी अतिक्रमणे होत असल्याचे बैठकीत बोलून दाखविण्यात आले.

(३) नव्या मुंबईच्या वाढीसाठी, विशेषतः तेथील कृषि उत्पादनांच्या घाऊक बाजार पेठांसाठी नितांत आवश्यकता असलेल्या कळवा-तुर्भे मालवाहू रेल्वे धक्क्याचा बांधणी खर्च मूळ अंदाजित रु.८ कोटीवरुन आजच्या घडीस रु.२१ कोटी-पर्यन्त गेला असल्याचे बैठकीत निदर्शनास आणण्यात आले. हा प्रकल्प जितका लवकर मूर्त स्वरुपात येईल तितका बरा असा विचार बैठकीत व्यक्त झाला. या संदर्भात असा खुलासा करण्यात आला की या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला जावा म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने राज्य शासनाला विनंती केली आहे. सदर निधी प्राधिकरणाकडे येताच तो प्रकल्प कार्यवाहीसाठी सिडकोकडे सुपूर्द करण्यात येईल.

या संदर्भात मानखुर्द-पनवेल रेल्वे प्रकल्पावर, विशेषतः सदर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासंबंधी (मानखुर्द-बेलापूर) बैठकीत चर्चा झाली. अशा विकास प्रकल्पांना रेल्वेने उचित प्राधान्यक्रम देऊन खर्चाचा अविभाज्य वाटा उचलावा याबाबत बैठकीत सर्वांचे मतैक्य झाले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांनी/तथा राज्यमंत्री-नगर विकास यांनी अशा प्रकल्पांचा भारत सरकारकडे पाठपुरावा करावा अशी विनंती करण्यात आली.

(४) शीव येथील लोकमान्य टिळक पालिका सामान्य रुग्णालयाजवळ, वांद्रे-कुर्ला समूहातील जमिनीवरील कथित अतिक्रमणाविरुद्धच्या कारवाई संदर्भात सादर करण्यात आलेल्या कार्यवाही-वृत्ताच्या अनुलक्षाने असा अभिप्राय व्यक्त करण्यात आला की सदर भागातील अतिक्रमक व भरावाचे सामान टाकणाऱ्या ट्रक चालकांविरुद्ध पोलीसांनी कारवाई केली हे खरे असले तरी ज्या व्यक्तींच्या प्रेरणेने अतिक्रमणे झाली त्या व्यक्तींविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही. तेव्हा या व्यक्ती कोण आहेत ते पोलिसांनी शोधून काढून त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी, अशी इच्छा व्यक्त करण्यात आली.

सदस्यांच्या सूचनेवरुन वांद्रे-कुर्ला समूहातील अतिक्रमणांच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची बैठक आयोजित करण्याचे पुनश्च मान्य करण्यात आले.

त्यानंतर, जमिनीवरील अतिक्रमणांच्या सर्वसाधारण प्रश्नांवरही प्रदीर्घ चर्चा झाली. मुंबई महानगर प्रदेशांत होणारी भू-अतिक्रमणे हा दखलपात्र गुन्हा समजून आणि तसा हेतू नजरेसमोर ठेवून आवश्यक तो कायदा अग्रक्रमाने तयार करण्यात यावा असे प्राधिकरणाचे मत आहे म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे हे मत राज्य शासनाला कळविण्यात यावे याबाबत मतैक्य झाले.

तसेच खोटी शपथपत्रे सादर करणा-या व्यक्तींवर चांचणीदाखल खटले भरण्यात यावेत, अशीही या निमित्ताने सूचना करण्यात आली.

त्यानंतर प्राधिकरणाने कार्यवाही-अहवालाची नोंद घेतली.

बाब क्र.३ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (कर्मचा-यांचे अंशदायी भविष्य निर्वाह निधी) विनियम, १९७९ मध्ये दुरुस्ती.

---

उपरोक्त बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.२०७ :

असा ठराव करण्यात येत आहे की, स्थायी समितीने दिनांक ८ डिसेंबर १९८२ रोजी ठराव क्र.१८१ अन्वये तयार व शिफारस केलेली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी (अंशदायी भविष्य निर्वाह निधी) विनियम १९७७ मध्ये दुरुस्ती करण्याची शिफारस करणारी प्रारुप दुरुस्ती मंजूर करण्यात येत आहे. हे विनियम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ५० खाली स्वतः तयार केले आहेत असे मानण्यात येईल.

बाब क्र.४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (कर्मचा-यांचे अंशदायी भविष्य निर्वाह निधी) विनियम १९७९-- कर्मचा-यांनी वर्गणी आणि प्राधिकरणाचे अंशदान (गतकालीन) ही दोन्ही प्रारंभी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्वतः जमा करण्याबाबत.

---

उपरोक्त बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२०८ :

असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, या प्राधिकरणाच्या दिनांक १३ डिसेंबर १९७९ च्या ठराव क्र.१८८ ला धरुन त्यापुढे या बाब टिप्पणीतील प्रस्तावास, त्यात उल्लेख असलेल्या शर्तींच्या अधीन राहून हे प्राधिकरण मान्यता देत आहे.

बाब क्र.५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी (गृहबांधणी कर्ज) विनियम १९८१--मध्ये दुरुस्ती.

उपरोक्त बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.२०९ :

असा ठराव करण्यांत येत आहे की स्थायी समितीने दिनांक ८ डिसेंबर १९८२ रोजी आपल्या ठराव क्र.१८९ अन्वये तयार व शिफारस केलेली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी (गृहबांधणी कर्ज) विनियम १९८१ मध्ये दुरुस्ती सुचविणारी प्रारुप दुरुस्ती हे प्राधिकरण मंजूर करीत आहे. हे विनियम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ५० खाली प्राधिकरणाने तयार केले आहेत असे मानण्यांत येईल.

बाब क्र.६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (प्रशासिक मोटारगाडी) विनियम १९७७ मध्ये दुरुस्ती

उपरोक्त बाब टिप्पणीवर विचारविमर्श करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.२१० :

असा ठराव करण्यात येत आहे की स्थायी समितीने तिच्या दिनांक ८ डिसेंबर १९८२ रोजी झालेल्या सभेमध्ये ठराव क्र. १९३ अन्वये, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (प्रशासिक मोटारगाडी) विनियम १९७७ मध्ये शिफारस केलेल्या दुरुस्त्या हे प्राधिकरण मंजूर करीत आहे. या दुरुस्त्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४च्या कलम ५० खाली तयार केलेल्या आहेत असे मानण्यात येईल.

बाब क्र.८ : वद्धि-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी असलेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेला १९८१-८२ सालाचा अहवाल.

उपरोक्त बाब टिप्पणी विचारात घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.२११ :

असा ठराव मंजूर करण्यांत येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक नगर विकास व नियोजन अधिनियम १९६६ च्या कलम 133 अन्वये आवश्यक असल्या-प्रमाणे वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९८१-८२ सालचा वार्षिक प्रारुप अहवाल प्राधिकरण यव्दारे संमत करीत आहे आणि तो राज्य शासनाकडे सादर करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

बाब क्र.९ : आकस्मिकरित्या तेल सांडणे आदी कारणांमुळे होणाऱ्या सागरी प्रदूषणाचा विचार करणे आणि उपाय योजनेसाठी आकस्मिक योजना तयार करणे यासाठी एका उप समितीची रचना.

या विषयावर प्रदीर्घ चर्चा झाली. चर्चेत असे मत व्यक्त करण्यात आले की, जमिनीवरील प्रदूषण आणि समुद्र किनाऱ्यापासून सागरोत्तर पाच कि.मी.अंतरापर्यन्त जलपट्टीत उद्भवणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याची एकूण जबाबदारी महाराष्ट्र जल (प्रदूषण व नियंत्रण) मंडळाची आहे व पांच कि.मी.पलीकडील सागरी भागात होणाऱ्या जल प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याचे काम मध्यवर्ति जल प्रदूषण व नियंत्रण मंडळ पहात असते. म्हणून हा प्रश्न महाराष्ट्र जल (प्रदूषण व नियंत्रण) मंडळाने आपल्या हाती घ्यावा म्हणून मंडळास विनंती करण्यात यावी आणि या मंडळास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कोणत्याही सहाय्याची गरज भासल्यास सदर मंडळाकडून तशी विनंती आल्यावर हे प्राधिकरणावर ती विचारात घेईल. म्हणून उपरोक्त विषयावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाखाली वेगळी समिती स्थापन करण्याची आवश्यकता नाही असे मत व्यक्त करण्यात आले.

बाब क्र.११ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे १९८०-८१ व १९८१-८२ सालाचे वार्षिक अहवाल.

बाब टिप्पणी विचारात घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२१२ :

असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन १९८०-८१ आणि १९८१-८२ सालच्या वार्षिक अहवालाना हे प्राधिकरण मान्यता देत आहे. हे अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

बाब क्र.१४ : संकल्पित पश्चिम बेट मुक्तमार्ग प्रकल्प
(लांबणीवर टाकलेली बाब)

मुंबई सभोवतालच्या जल क्षेत्रात सुयोग्य प्रवासी जल वाहतूक सेवा उपलब्ध करुन देण्याची सुसाध्यता अजमावण्यासाठी राज्य शासनाने (गृह विभाग) जो अभ्यास-गट नियुक्त केला आहे त्या अभ्यास-गटाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच उपरोक्त बाब विचारात घेता येईल. असे हया बाबीच्या संदर्भात मत प्रदर्शन करण्यात आले. म्हणून या बाबीवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

पटल बाब : वांद्रे-कुर्ला समूहाच्या अंतिम नियोजन प्रस्तावात किरकोळ फेरफार

सदर बाब टिप्पणी प्राधिकरणाने विचारात घेतली आणि या बाब टिप्पणीत सूचित केल्याप्रमाणे आपल्या ठराव क्रमांक १९४ मध्ये अतिरिक्त परिच्छेद अंतर्भूत करण्यास मान्यता दिली. अतिरिक्त मजकूरासह ठराव क्र.१९४ यापुढे असा वाचण्यात येईल.

ठराव क्र.१९४ :

असा ठराव करण्यांत येत आहे की, महानगर प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे (महाराष्ट्र अधिनियम ३७ सन १९६६) कलम ४०(१) (क) नुसार वांद्रे-कुर्ला समूहाच्या अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त झालेले विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने प्राधिकरण **वरील** अधिनियमाचे कलमे ४०(३), ११३(अ) (८) व कलम ३७ अन्वये प्रदान केलेले व त्याला सहाय्यभूत असलेले इतर सर्व अधिकार वापरुन राज्य शासनाने दिनांक ९ एप्रिल १९७९ ची अधिसूचना क्रमांक बीकेआर-११७७/२६२/युडी-५ ने मंजूर केलेल्या नियोजन प्रस्तावास किरकोळ बदल करण्यास याव्दारा मान्यता देत आहे. हे किरकोळ बदल खालीलप्रमाणे आहेत :

"शीव-धारावी मार्गाला जोडणारा 'एच' ब्लॉकमधील ३० मी. रुंदीचा स्कीम रोड दक्षिणेच्या टोकास किंचित पश्चिमेच्या बाजूस हलविण्यात आला असून बेस्ट आगाराचे क्षेत्र २ हेक्टरवरुन २.२८ हेक्टरपर्यंत वाढविण्यात आले आहे. वरील कारणामुळे इतर बदल करण्यात आले आहेत. सर्व बदल सोबत जोडलेल्या नकाशांत दाखविले आहेत.(जोडपत्र-२)

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७ खालील अधिकार व त्याला सहाय्यभूत असलेले अधिकार वापरुन प्राधिकरण यव्दारा, वरील फेरबदलाबाबत शासन राजपत्रांत व 'टाइम्स ऑफ इंडिया व लोकसत्ता' या स्थानिक वृत्तपत्रांत नोटीस प्रसिध्द करुन ती प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १ महिन्याच्या आंत जनतेकडून अशा फेरबदलास हरकती व सूचना मागविण्याचे मान्य झाले आहे.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम १३९ व १९७४ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम ७(अ) ने प्रदान केलेले अधिकार वापरुन प्राधिकरण यव्दारा उपरोल्लेखित खंडानुसार नोटीस प्रसिध्द करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांस देत आहे.

पुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या उक्त अधिनियमाच्या कलम १५१(३) खाली प्रदत्त अधिकारांचा वापर करुन हे प्राधिकरण असा आदेश देत आहे की, फेरफारीत नियोजन प्रस्तावांच्या संदर्भात ज्या हरकती वा सूचना प्राप्त होतील त्या महानगर आयुक्तांनी विचारांत घ्याव्यात. तसेच अशा हरकती वा सूचना सादर करणाऱ्या व्यक्तींची प्रतिवेदने ऐकून घेतल्यावर महानगर आयुक्तांनी उक्त अधिनियमाच्या कलम ३७ मधील नियमाना धरुन प्रस्तावित फेरफार, त्यावरील आपल्या अहवालासह अंतिम मंजुरीसाठी शासनाला सादर करावा.

बैठकीत उपरोक्त कामकाज होईपर्यन्त दुपारचे साडेबारा वाजून गेले होते. त्यानंतर सभाध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे काम स्थगित झाले.

---

जोडपत्रे...अ.ब.क /-

जोडपत्र-'अ'

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची सत्ताविसावी बैठक

दिनांक : २८ जानेवारी, १९८३

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| १) | सौ.प्रतिभा दे.पाटील,<br>नगर विकास मंत्री. | अध्यक्षा |
| २) | श्री.बनवारीलाल भ.पुरोहित,<br>नगर विकास राज्यमंत्री. | उपाध्यक्ष |
| ३) | डॉ. प्रभाकर सं. पै,<br>मुंबईचे महापौर. | उपाध्यक्ष |
| ४) | डॉ.व्ही.सुब्रह्मण्यन्,<br>मंत्री आणि अध्यक्ष,<br>मुंबई जिल्हा नियोजन व विकास परिषद. | सदस्य |
| ५) | श्री.मिठालाल र.जैन,<br>अध्यक्ष,ठाणे जिल्हा परिषद. | सदस्य |
| ६) | श्री.एकनाथ रा.कोपर्डे,<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>मुंबई महानगरपालिका. | सदस्य |
| ७) | श्रीमती इंदुमती पटेल,<br>अध्यक्षा, सुधार समिती,<br>मुंबई महानगरपालिका, | सदस्या |
| ८) | श्री.बाबुभाई ह.अमीन,<br>अध्यक्ष,बेस्ट समिती,<br>मुंबई महानगरपालिका. | सदस्य |
| ९) | श्री.भि.धों.कुटे,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका. | सदस्य |
| १०) | श्री.वि.ग.धारप,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ११) | श्री.अमरनाथ वा. पाटील,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| १२) | डॉ.अ.उ.मेमन,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | सदस्य |

२.../-

१३) श्री.प्रल्हाद हि.अडवानी, सदस्य
अध्यक्ष,उल्हासनगर पालिका परिषद.

१४) श्री.विवेकानंद शं.पाटील, सदस्य
अध्यक्ष,पनवेल पंचायत समिती.

१५) श्री.युसुफ हाफीज, सदस्य
विधान सभा सदस्य

१६) श्री.सी.डी.उमाचेन, सदस्य
विधान सभा सदस्य,

१७) श्री.राम नाईक, सदस्य
विधान सभा सदस्य,

१८) श्री.तुकाराम ए.सुर्वे, सदस्य
विधान सभा सदस्य.

१९) श्री.राम म.त्रिपाठी, सदस्य
विधान परिषद सदस्य.

२०) श्री.राम महाडिक, सदस्य
अध्यक्ष, सिडको.

२१) श्री.द.म.सुकथनकर, सदस्य
महानगरपालिका आयुक्त,
मुंबई महानगरपालिका.

२२) श्री.अ.ना.बटब्याल, सदस्य-सचिव
महानगर आयुक्त,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

निमंत्रित :

१) श्री.ल.च.गुप्ता,
सचिव, नगरविकास विभाग,
मंत्रालय.

२) श्री.आर्.एम्.प्रेमकुमार,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
मुंबई.

---

(189)

जोडपत्र " ब "

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची
सत्ताविसावी बैठक

दिनांक : २८ जानेवारी, १९८३.

अध्यक्षीय भाषण

या प्राधिकरणाचे उपस्थित पदाधिकारी आणि अधिकारीवर्ग हो,

नगर विकास विभागाची अधिकारसूत्रे मी हाती घेतल्यानंतर आज प्रथमच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बैठकीत आपणा सर्वांना भेटताना मला फार आनंद होत आहे. या प्राधिकरणावर सर्वश्री

१] बनवारीलाल भ.पुरोहित,
नगर विकास आणि गृहनिर्माण राज्यमंत्री
आणि आपल्या प्राधिकरणाचे विद्यमान उपाध्यक्ष,

२] रामरावजी आदिक,
वित्त मंत्री,

३] नरेंद्रजी तिडके,
उद्योग मंत्री,

४] आमदार, रामचंद्र तथा भाई बंदरकर,

५] विवेकानंद शंकर पाटील, अध्यक्ष, पनवेल पंचायत समिती,

हे नवीन सदस्य आलेले असून आज या बैठकीच्या निमित्ताने मी त्यांचे स्वागत करते.

२. सर्वश्री डॉ.बळीरामजी हिरे, प्राध्यापक असीर शेख महंमद इस्माईल, सि.ना. तथा एस्.एन्.देसाई आणि भा.ना.आडारकर हे आता प्राधिकरणाचे सदस्य नाहीत. या सर्वांनी सदस्य या नात्याने आपला मौलिक वेळ व सेवा प्राधिकरणाला वेळोवेळी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानते.

३. या प्राधिकरणाचे महानगर आयुक्त श्री.भा.दृ.हळवे यांची १८ ऑक्टोबर, १९८२ पासून शासनाच्या अन्य विभागात बदली होऊन श्री. अ.ना.बटब्याल यांनी महानगर आयुक्तपदाची सूत्रे आपल्या हाती घेतली आहेत व आजच्या बैठकीस महानगर आयुक्त या नात्याने ते प्रथमत: उपस्थित आहेत. त्या निमित्ताने श्री. बटब्याल यांचेही मी स्वागत करते. तसेच माजी महानगर आयुक्त श्री. हळवे यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची प्राधिकरणातर्फे आणि अध्यक्षा या नात्याने मी या प्रसंगी खास उल्लेख करू इच्छिते.

४. आपल्या प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला समूह प्रकल्प, वडाळा येथील ट्रक टर्मिनल प्रकल्प, मुंबई महानगर प्रदेशांत जागतिक बँकेच्या सहाय्याने गरीब लोकांसाठी हाती घेण्यांत यावयाचा निवारा प्रकल्प, घाऊक कापड बाजारपेठेचे वांद्रे-कुर्ला समूहांत स्थलांतर, ओशिवरे येथील संकल्पित जिल्हा विकास केंद्र, माहीम निसर्ग उद्यान आदी प्रकल्प हाती घेतले असून या प्रकल्पांच्या उभारणीत आजवर झालेल्या प्रगतीचा उल्लेख करणे या प्रसंगी उचित ठरेल. या प्रकल्पांच्या बाबतीत आतापर्यन्त झालेली कामाची प्रगति अशी आहे :

[१] वांद्रे-कुर्ला समूह :

वांद्रे-कुर्ला समूह प्रकल्पाच्या अंमलबजावणीत इतर कामांबरोबरच आपल्याला माहीम खाडीवरील पाच पूलांचा पाया अधिक मजबूत बनविण्याचे काम आणि समूहाच्या कांही भागात जमिनीच्या पुन:प्रापणाचे काम हाती घ्यावे लागेल. माहीम कॉजवे, तानसा जलवाहिनी पूल आणि वैतरणा जलवाहिनी पूल यांचेही मजबूतीकरण करणे आवश्यक आहे. त्याखेरीज चालू आर्थिक वर्षात एक रेल्वे पूल आणि एका रस्ता-पूलाचे काम सुरु होईल अशी अपेक्षा आहे. माहीम कॉजवे मजबूत करण्याचे सध्या चालू असलेले काम जून १९८३ पर्यन्त पूर्ण होईल अशी आशा आहे. तसेच वांद्रे-कुर्ला समूहाच्या रेल्वे-कार-शेड क्षेत्रांत आणि "जी" व "जीएन " ब्लॉकचा काही भाग यामध्ये मिळून २३ हेक्टर क्षेत्रांत करावयाचे पुन:प्रापण व शिवाय इतर कांही कामेही लवकरच सुरु होणार आहेत.

[२] वडाळा-अनिक येथील ट्रक टर्मिनल :

वडाळा-अनिक येथील संकल्पित ट्रक टर्मिनलसाठी २१ हेक्टर क्षेत्रांत पुन:प्रापणाचे काम सध्या बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे चालू आहे. शिवाय या ट्रक टर्मिनल क्षेत्रात मोडणाऱ्या १२.७ हेक्टर भागांतही पुन:प्रापण करण्याच्या दृष्टीने पूर्वतयारी झालेली आहे आणि या कामासाठी प्राधिकरणाने यापूर्वीच निविदा मागविल्या आहेत.

[३] मुंबई महानगर प्रदेशांत गरीब लोकांसाठी निवारा कार्यक्रम :

अल्प उत्पन्न गटांतील लोकांसाठी जागतिक बँकेचे अर्थसहाय्य

मिळून......३/--

मिळून मुंबई महानगर प्रदेशांत एक निवारा कार्यक्रम हाती घेण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण, सिडको आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यातर्फे जी एक योजना सध्या आकार घेत आहे त्या योजनेत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सक्रीय सहभाग घेतला आहे. या निवारा प्रकल्पाच्या समन्वय, कार्यक्रम-आखणी आणि संनियंत्रणाच्या कार्यासाठी या प्राधिकरणाची कर्णधार संस्था म्हणून नेमणूक झालेली आहे. आजच्या बैठकीत या निवारा प्रकल्पाच्या संदर्भात एक टिप्पणीही सादर करण्यांत आली आहे.

[४] कापडाच्या घाऊक बाजार पेठेचे वांद्रे-कुर्ला समूहांत स्थलांतर :

मुंबईतील कापडाची घाऊक बाजारपेठ ही सध्या शहराच्या दक्षिण भागांत म्हणजे क्रॉफर्ड मार्केटजवळ विस्तारलेली दिसते. या बाजारपेठेला सध्याची जागा अतिशय अपुरी पडत आहे. म्हणून या घाऊक बाजारपेठेचे वांद्रे-कुर्ला समूहांत स्थलांतर करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. नियोजित उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून वांद्रे-कुर्ला समूहांत घाऊक बाजारपेठेचे स्थलांतर करण्याच्या दृष्टीने कापड व्यवसायाशी संबंधित संस्था आणि त्यांचे महासंघ यांच्याशीही आतापर्यंत बैठका घेऊन विचारविमर्श केलेला आहे. वांद्रे-कुर्ला समूहांत कापड बाजारपेठेसाठी उभारावी लागणारी दुकाने, कार्यालये वखारी तसेच कमिशन-एजंट यांना लागणाऱ्या जागेचा संभाव्य अंदाज घेण्यासाठी प्राधिकरणातर्फे सध्या या घाऊक बाजारपेठेसाठी ग्राहक-मागणी नोंदविण्याचे काम चालू आहे. या संदर्भात व्यापारी वर्गाकडून मिळालेला प्रतिसाद फारच चांगला आहे.

[५] ओशिवरे येथील संकल्पित जिल्हा विकास केंद्र :

गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यांत या प्राधिकरणाची बैठक झाली त्यावेळी ओशिवरे येथे एक जिल्हा विकास केंद्र विकसित करण्यासाठी नियोजनाचे काम हाती घेण्याचा निर्णय घेण्यांत आला होता हे आपणांस माहित असेलच. या संकल्पित जिल्हा विकास केंद्रासाठी एक

विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची यापूर्वीच नियुक्ती झाली आहे· तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या उक्त अधिनियमातील संबंधित तरतुदीखाली प्रस्तुत जिल्हा विकास केंद्राच्या क्षेत्रांत मोडणारी खाजगी मालकीची जमीन संपादन करण्यासाठी योग्य ती अधिसूचना शासनाने यापूर्वीच प्रवृत्त केली आहे· या जिल्हा विकास केंद्राच्या पहिल्या टप्प्यांत जे काम हाती घेण्यात येईल त्यासाठी लागणारी जमीन ही महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत येते· ही जमीन देखील ताब्यात घेण्यासाठी आमचे प्रयत्न चालू आहेत· पहिल्या टप्प्यांत १० हेक्टर जमिनीवर एक " मध्यवर्ती व्यापार क्षेत्र " विकसित करण्यांत यावयाचे आहे· सदर मध्यवर्ती व्यापार क्षेत्रासाठी एक " नगर संकल्पन स्पर्धाही " आयोजित करण्यांत आली आहे· प्रस्तावित मध्यवर्ती व्यापार क्षेत्रासाठी एक उत्कृष्ट नमुना निवडता यावा ही त्या मागील कल्पना आहे· मे·१९८३ पर्यन्त हा संकल्पनात्मक नमुना निवडण्यांत येईल अशी अपेक्षा आहे·

[६] माहीम निसर्गोद्यान :

वांद्रे-कुर्ला प्रकल्पाच्या " एच् " ब्लॉकमध्ये १८ हेक्टर क्षेत्रात " माहीम निसर्गोद्यान " विकसित करण्याची प्राधिकरणाची योजना आहे· हे भू-क्षेत्र माहीम निसर्गरक्षित विभागाच्या ८७ हेक्टर भू-क्षेत्रास लागूनच आहे· या माहीम निसर्गरक्षित विभागांत मोडणा-या भू-भागाचे पुन:प्रापण न करता तो भाग निसर्गदत्त स्वरुपात राखून ठेवण्यात येईल· माहीम निसर्गोद्यानात जमिनीचा वापर आणि योजनेची कार्यवाही कशी करावी यासाठी शिफारशी करण्याकरिता शासनाने नेमलेल्या अभ्यास गटाचा अहवाल सध्या तयार आहे· सध्या जागेचे संरेखन पूर्ण झाले आहे आणि त्या भागांत कुंपण घालण्याचे काम सुरु झाले आहे· माहीम निसर्गोद्यानाच्या उभारणीस ३ ते ४ वर्षे लागतील असा अंदाज आहे·

५· शेवटी, आणखी एका प्रश्नाचा येथे मी उल्लेख करु इच्छिते· आपल्याला माहीत असेलच की, मुंबई महानगर प्रदेश विकास

प्राधिकरण अधिनियमाच्या कलम १८ [१] [अ] अन्वये या प्राधिकरणाला विकास योजनाच्या कार्यवाहीसाठी शासनाकडून अर्थसहाय्य मिळण्याची तरतूद आहे. या दृष्टीने प्राधिकरणाने योग्य ते प्रस्ताव तयार करुन हे प्रस्ताव अर्थसहाय्यार्थ शासनाला सादर करावेत म्हणजे ज्या प्रकल्पांना शासनाची प्रशासनिक मान्यता लाभेल अशा प्रकल्पांना पुरेसे अर्थसहाय्य करण्यावर शासन विचार करील, ही सूचना राज्य शासनाने तत्वत: मान्य केली आहे. या प्राधिकरणाने कांही प्रकल्प तयार करुन ते राज्य शासनाला यापूर्वीच सादर केले आहेत. या प्रकल्पामध्ये मुंबई महानगर प्रदेशांत अल्प उत्पन्न गटातील लोकांसाठी असलेल्या "किफायतशीर निवारा " कार्यक्रमाचाही समावेश असून या प्रकल्पांच्या कार्यवाहीसाठी एकूण रु.१,२५३.१४ लाख एवढे अर्थसहाय्य प्राधिकरणाने शासनाकडे मागितले आहे.

.....जोडपत्र "क" ठराव...६/-

जोडपत्र " क "

ठराव :

" श्री·भा·कृ·हळवे यांनी या प्राधिकरणाचे व स्थायी समितीचे सदस्य-सचिव आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त या नात्याने दिनांक २२ जून, १९८१ ते दिनांक १७ ऑक्टोबर १९८२ पर्यंत केलेल्या कार्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण गौरवपूर्ण उल्लेख करीत आहे· श्री·हळवे यांनी आपल्या कारकिर्दीत या प्राधिकरणाच्या अनेक प्रकल्पाच्या कामात विशेष रस घेतला· विशेषत: मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची आर्थिक बाजू भक्कम व्हावी आणि प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पांना राज्य योजनेतून निधी दिला जावा म्हणून शासनाची संमत्ती मिळविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले· श्री· हळवे यांना, त्यांचा भावी सेवा काळ उज्वलशील जावो अशी सदिच्छा हे प्राधिकरण व्यक्त करीत आहे· "

---

एनपी/८३०८२·

# MINUTES OF THE TWENTY-SEVENTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY.

DATE : 28th January, 1983 (Friday).

TIME : 10.30 A.M.

PLACE : Committee Room (6th Floor), Mantralaya.

A list of Members present is enclosed (Annexure-A).

The meeting began with the Address of the Chairman. A copy of the Address is enclosed (Annexure-B).

A Resolution appreciating the services rendered by Shri B.K. Halve as Metropolitan Commissioner was next adopted (Annexure-C).

It was agreed to take up for consideration the following Items Nos. 1 to 6,8,9,11 and 14 on the Agenda and the Table Item first and rest of the items thereafter if the time permitted:-

Item No.1 : Confirmation of the minutes of the last (26th) Meeting.

The minutes were confirmed.

Item No.2 : Action taken on the minutes of the last (26th) Meeting.

During the course of discussion on this item, the following observations and points were made :-

(1) Reiterating to the suggestion that the execution of Middle Vaitarna Project be expedited in the interest of Bombay's water supply, it was observed that question of making available the required funds be sorted out on priority basis. It was further suggested that copy of the note prepared by the Municipal Commissioner for the consideration of the Leaders in the Bombay Municipal Corporation should also be made available to the Members of the BMRDA.

(2) Referring to the action taken report on Item No.5, viz. Acquisition of land for Kalyan Growth Centre, it was observed that the land of the Growth Centre is being encroached upon at various places such as Kolsewadi, etc.

(3) It was......

(3) It was observed that the original estimate of Rs.8/- crores for Kalwa-Turbhe Goods Siding which is essential for development of New Bombay, particularly the new complex of wholesale markets in Agricultural Commodities at Turbhe, was reported to have gone up to Rs.21/- crores. The sooner the project is completed, the better it will be. It was explained that BMRDA has already requested State Government to make available the required funds which will be passed on to the City and Industrial Development Corporation of Maharashtra Ltd. for this project.

In this context the Mankhurd-Panvel Railway Project, especially the 1st phase thereof (Mankhurd-Belapur) was considered. Consensus of opinion was that for such development projects Railways should give due priority and bear its legitimate burden. The Vice-Chairman, BMRDA (MS-UD) was requested to pursue such projects with Government of India.

(4) Arising out of action taken report on reported encroachment on land in Bandra-Kurla Complex near L.T.M.G. Hospital, Sion it was observed that Police took action against encroachers and the truck operators dumping the waste material in the area. However, action has not been taken against the persons who motivated the encroachment. It was desired that the Police should be asked to investigate and take action against such persons also.

At the suggestion of the Members it was again agreed to convene a Meeting of the BMRDA to discuss issue regarding encroachment in Bandra-Kurla Complex.

General issue regarding encroachments on land was also discussed thereafter at length. The consensus of opinion was that Government should be informed that BMRDA is of the view that unauthorised encroachments on land in Bombay Metropolitan Region should be made a cognizable offence and with that end in view necessary legislation may be made on priority. It was also suggested that some test cases should be made by prosecuting persons making false affidavits.

The action......

The action taken report was then noted by the Authority.

Item No.3 : BMRDA (Employees' Contributory Provident Fund) Regulations, 1979 - Amendment to -

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.207 :

"Resolved that the draft amendment to the BMRDA Employees' (Contributory Provident Fund) Regulations, 1979, as prepared and recommended by the Standing Committee in its 20th Meeting held on the 8th December, 1982, *vide* Resolution No.181 are approved. These Regulations shall be deemed to have been prepared by the Authority under Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act,1974."

Item No.4 : BMRDA (Employees' Contributory Provident Fund) - Crediting employees' subscription and BMRDA's contribution initially by BMRDA for the past period.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.208 :

"Resolved that in continuation of the Authority's Resolution No.168, dated 13th December 1979, the Authority hereby approves the proposal made in the item note, subject to the conditions mentioned therein."

Item No.5 : BMRDA Employees ( Housing Loans ) Regulations, 1981 - Amendment to -

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.209 :

"Resolved that the draft amendment to the BMRDA Employees (Housing Loans) Regulations, 1981, as prepared and recommended by the Standing Committee in its 20th meeting held on the 8th December,1982, *vide* Resolution No.189 are approved. These Regulation shall be deemed

to have......

to have been prepared by the Authority under Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act,1974."

Item No.6 : BMRDA (Staff Car) Regulations, 1977 - Amendment to -

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.210 :

"Resolved that the amendments to the BMRDA(Staff Car) Regulations, 1977 prepared and recommended by the Standing Committee in its 20th meeting held on 8th December, 1982 *vide* Resolution No.193 are approved. These amendments shall be deemed to have been made by the Authority under Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974."

Item No.8 : Annual Report by the BMRDA as a Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area for the year 1981-82.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.211 :

"Resolved that the Authority hereby approves the draft of the Annual Report for the year 1981-82 of the BMRDA as a Special Planning Authority for Bandra-Kurla Notified Area as required under Section 133 of the M.R.T.P. Act, 1966 and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.9 : Constitution of a Sub-Committee to consider marine pollution due to accidental oil spillage etc. and to prepare a Contingency Plan.

This issue was discussed at length. It was observed that the Maharashtra Water(Prevention and Control of Pollution) Board is responsible for overall control of pollution on land and on the sea upto 5 kilometres from the coast beyond which the responsibility lies with the Central Board for the Prevention and Control of Water Pollution.

It was ....

It was, therefore, decided that the Maharashtra Water (Prevention and Control of Pollution) Board be requested to take up this issue and if it requires any assistance from the BMRDA, the Authority will consider making such assistance available on a request from it. No separate Committee need be constituted under BMRDA.

Item No.11 : Annual Reports of the BMRDA 1980-81 and 1981-82

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.212 :

"Resolved that the Authority approves the drafts of the Annual Reports of the B.M.R.D.A. for 1980-81 and 1981-82 and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.14 : Proposed West Island Freeway Project (W.I.F.) (Deferred item)

It was observed that decision on this Item could be taken only after the receipt of report of the Study Group appointed by Govt. in Home Department to study the feasibility of providing suitable Passenger Water Transport Services around Bombay. The consideration of the Item was therefore again deferred.

Table Item : Minor modification to the final planning proposals of the Bandra-Kurla Notified Area.

The Authority considered the Item Note and agreed to add the additional paragraph to its Resolution No.194 as suggested. The Resolution No.194 with this addition reads as under :-

RESOLUTION NO. 194 :

"Resolved that the Authority being the Special Planning Authority for the Bandra-Kurla

Notified Area.............

Notified Area appointed under Section 40(1)(c) of the M.R.T.P. Act, 1966 (Maharashtra Act No.XXXVII of 1966) do in exercise of its powers under Section 40(3) read with Section 113 (A)(8) jointly with Section 37 of the said Act and all other powers enabling it in this behalf, approve of the Planning Proposals sanctioned by the State Government under Notification No.BKR-1177/262-UD-5, dated the 9th April,1979, being modified marginally in the manner and to the extent specified as follows; that is to say: 30 metres wide scheme road in 'H' Block branching from Sion-Dharavi Road is shifted slightly towards west at the southern end the area of BEST bus depot is increased from 2 ha. to 2.28 ha. Due to above, other consequential changes are made. All the changes are more specifically shown on the map enclosed (Annexure II) to the original Item Note.

Resolved further that the Authority do in exercise of the powers under Section 37 of the said Act and other powers enabling it in this behalf approve of a notice being published in the Official Gazette and in two local newspapers being the 'Times of India' and the 'Loksatta' inviting objections and suggestions from the public with respect to such modifications not later than 1 month from the date of such notice.

Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said Act read with Section 7(A) of the Bombay Metropolitan Region Development Authority Act,1974 authorise the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing clauses.

Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 151(3) of the said Act direct that the Metropolitan Commissioner shall consider the objections/suggestions which may be received in this behalf, after giving hearing to persons presenting such objections/suggestions and shall submit his report to the State Government alongwith proposed modifications for final sanction in terms of Section 37 of the said Act."

At this stage, it being past 12.30 p.m., the meeting adjourned after a vote of thanks to the Chair.

-----ʊʊʊʊʊʊʊʊʊʊʊʊʊʊʊʊ----

ANNEXURES..A,B,C...

LP:830216:

(201)

ANNEXURE 'A'

## 27TH MEETING OF THE B.M.R.D.A.

Date : 28th January, 1983

MEMBERS PRESENT:

| | | |
|---|---|---|
| 1) | Smt. Pratibha D. Patil, Minister for Urban Development. | Chairman. |
| 2) | Shri Banwarilal B. Purohit, Minister of State for Urban Development. | Vice-Chairman. |
| 3) | Dr. Prabhakar S. Pai, Mayor of Bombay. | Vice-Chairman. |
| 4) | Dr. V. Subramanian, Minister for Planning and Chairman, D.P.D.C., Bombay. | Member. |
| 5) | Shri Mithalal R. Jain, President, Thane Zilla Parishad. | Member. |
| 6) | Shri Eknath R. Koparde, Chairman, Standing Committee, B.M.C. | Member. |
| 7) | Smt. Indumati T. Patel, Chairman, Improvements Committee, B.M.C. | Member. |
| 8) | Shri Babubhai H. Amin, Chairman, B.E.S.T. Committee, B.M.C. | Member. |
| 9) | Shri B. D. Zute, Councillor, B.M.C. | Member. |
| 10) | Shri V. G. Dharap, Councillor, B.M.C. | Member. |
| 11) | Shri Amarnath W. Patil, Councillor, B.M.C. | Member. |
| 12) | Dr. A. U. Memon, Councillor, B.M.C. | Member. |
| 13) | Shri P. H. Advani, President, Ulhasnagar-Municipal Council. | Member. |
| 14) | Shri Vivekanand S. Patil, Chairman, Panvel Panchayat-Samiti, Dist. Raigad. | Member. |

...2/-

15) Shri Usuf Haffiz, M.L.A. — Member.

16) Shri C. D. Oomachen, M.L.A. — Member.

17) Shri Ram Naik, M.L.A. — Member.

18) Shri T. E. Surve, M.L.A. — Member.

19) Shri Ram Manohar Tripathi, M.L.C. — Member.

20) Shri Ram Mahadik, Chairman, C.I.D.C.O. — Member.

21) Shri D. M. Sukthankar, Municipal Commissioner, B.M.C. — Member.

22) Shri A. N. Batabyal, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A. — Member-Secretary.

INVITEES :

1) Shri L. C. Gupta,
Secretary to Govt.,
Urban Development Department,
Mantralaya, Bombay.

2) Shri R. M. Premkumar,
Chief Executive Officer,
M.I.D.C., Bombay.

$$$$$$$$$$$$$$

PSN :

ANNEXURE 'B'

TWENTY-SEVENTH MEETING OF THE BMRDA

DATE : 28.01.1983

SPEECH OF THE CHAIRMAN

It is my privilege to preside over this Meeting for the first time after I have taken over as Minister for Urban Development. I take this opportunity to welcome the following new Members of the Authority :-

1. Shri Banwarilal B. Purohit, Minister of State for Urban Development and Housing. — Vice-Chairman of the Authority.
2. Shri Ramrao Adik, Minister for Finance.
3. Shri N.M. Tidke, Minister for Industries.
4. Shri R.S. Bandarkar (alias Bhai Bandarkar) M.L.C.
5. Shri Vivekanand S. Patil, Chairman, Panchayat Samiti, Panvel.

2. I also take this opportunity to place on record the services rendered by the following persons who have ceased to be the Members of the Authority :-

1. Dr. Baliram W. Hiray
2. Prof. Aseer Shaikh Mohd. Ismail
3. Shri S.N. Desai
4. Shri B.N. Adarkar

3. Shri B.K. Halve, Metropolitan Commissioner has been transferred with effect from 18th October, 1982 and Shri A.N. Batabyal has taken over as Metropolitan Commissioner I welcome Shri Batabyal who is attending the Meeting of the Authority for the first time after his appointment and place on record our appreciation of the services rendered by Shri Halve.

4. It will not be out of place if I also take this opportunity to apprise the Meeting of various developments in regard to the following Projects of the BMRDA :-

(1) Bandra-Kurla Complex/-....

(1) Bandra-Kurla Complex :

This Project inter-alia includes strengthening of 5 bridges across the Mahim Creek and reclamation of the area. Strengthening work on 3 bridges viz., Mahim Causeway, Tansa and Vaitarna Pipe line bridges, has already been started. Work of Railway Bridge and Dharavi Bridge is expected to start during 1983. Mahim Causeway work is physically expected to be completed by June 1983. Reclamation of 23 hectares land in Railway Car Shed area and 'G' and 'G-North' parts and some other works are also expected to start.

(2) Truck Terminal at Wadala Anik :

Reclamation work on land, admeasuring approx. 21 hectares through the Municipal Corporation of Greater Bombay is advancing. Another reclamation work on parcel of land admeasuring 12.7 hectares within the truck terminal site has now been initiated and tenders have already been invited by BMRDA for the same. Associated work for taking possession of rest of the land, processing necessary legislation, etc., are also being pursued.

(3) Affordable Low Income Shelter Programme in B.M.R. :

BMRDA in collaboration with MHADA, CIDCO, MCGB etc., has been actively involved in preparation of the above project with the World Bank assistance. BMRDA has been formally appointed as co-ordinating agency for planning, programming and monitoring of this project. A note on this subject has been placed before this meeting of the Authority.

(4) Shifting of Wholesale Textile Market in Bandra-Kurla Complex.

The Wholesale Textile Market in Bombay exists in the congested southern tip of Bombay near Crawford Market. In order to alleviate the congested conditions, the Authority has already decided to locate this market in Bandra-Kurla Complex. With that end in view, meetings with several Associations and their Federations have been arranged. The work of registration of demand for shop-cum-offices, godowns, commission agents' offices is in hand, The response from the merchant community is quite good.

(5) Development of /-......

(5) Development of District Centre at Oshiwara. :

It will be recollected that in October 1981, Authority has taken a decision for planning and development of District Centre at Oshiwara. BMRDA is already appointed as Special Planning Authority for the above District Centre. The Government has also notified privately owned land within the area of the District Centre for acquisition under the provisions of BMRDA Act. Efforts are also being made to secure MHADA's land to be developed as first phase of the Centre. An open urban design competition for 10 hectares core commercial area in the first phase of District Centre has been organised. The object is to choose an outstanding design for the proposed commercial complex. It is expected that by the end of May 1983, the conceptual design for the commercial complex will be chosen.

(6) Mahim Nature Park :

In Bandra-Kurla Complex Project, an area of about 18 hectares in Block 'H' is proposed to be developed as Mahim Nature Park. This area is adjacent to about 87 hectares land which is to be kept unreclaimed as Mahim Nature Reserve. The Project Group set up by the Government has prepared a report indicating various uses and stretegy for implementation of this Project. After demarcation of the site, work of chain-link fencing of the area has been started. It is expected that this Park will be developed in 3 to 4 years' time.

(7) Last but not the least is the question of making available requisite funds for various Projects. I am happy to state that the Govt. has now agreed that the BMRDA should prepare and submit suitable Projects and after those have been administratively approved, the State Govt. would consider providing requisite funds under Section 18(1)(a) of the BMRDA Act. Accordingly, BMRDA has submitted some projects for Government's approval. This year BMRDA has also sought Government's financial assistance to the tune of Rs.1,253.94 lakhs for various Projects, including Affordable Low Income Shelter Programme in B.M.R. We may now turn to the business on the agenda.

$$$$$$$$$$$$$$$$$$$$$

CGP.

ANNEXURE 'C'

RESOLUTION

That the Bombay Metropolitan Region Development Authority places on record the valuable services rendered by Shri B. K. Halve as Metropolitan Commissioner, and Member Secretary of the Authority and the Standing Committee during the period from 22.06.1981 to 17.10.1982. During this period, he evinced keen interest in various projects of the Bombay Metropolitan Region Development Authority. He was particularly emphatic in strengthening the financial side of the Bombay Metropolitan Region Development Authority and persuaded Government to agree to allocate funds for Bombay Metropolitan Region Development Authority's projects from State Plan. The Authority wishes Shri Halve every success in his future assignments.

\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$\$

CGP.

(207)

क्र : बीएम्आर्डीए/एम्टीजी/२७.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

दिनांक : १८ मार्च, १९८३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची दिनांक २८ जानेवारी, १९८३ रोजी तहकूब झालेली सत्ताविसावी बैठक पुन्हा दिनांक ४ मार्च, १९८३ रोजी झाली. त्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत कांही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

श्र. वि. आसगांवकर
१८/३/८३

( श्र. वि. आसगांवकर )
सचिव,
कार्यकारी समिती.

प्रति :

सर्व सदस्य व कायम निमंत्रित.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी

No.BMRDA/MTG/27.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan, 5th Floor,
Bandra (East), Bombay-400 051.

Date : 18th March, 1983.

The minutes of the Adjourned 27th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 4th March, 1983 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

S.V.Asgaonkar 18/3/83
( S. V. ASGAONKAR )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To

All Members and Permanent Invitees.

The Officers of the B.M.R.D.A.

.-.-.-.-.-.-.-.-.